**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**सेवेकरी भरती**

१) सुपरवायझर- १ | २) पुजारी- १

३) शेतगडी जोडी- २ | ४) सफाई सेवेकरी- १

५) वॉचमन- ३ | ६) स्वयंपाक बाई-१

यांप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे

होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट

अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट

संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १७६ वा | शुक्रवार, दि. १४ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# धर्मादाय उपायुक्त प्रदीप चौधरींना मा. मे. उच्च न्यायालयाने काढले वॉरंट आदेश

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** लाचखोर, भ्रष्ट व मगरुर प्रदीप चौधरी यांनी २०१७ साली सोलापूर येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात धर्मादाय उपायुक्त म्हणून कार्यरत असताना मा.मे. उच्च न्यायालयाचा अवमान केला म्हणून दाखल असलेल्या अवमान याचिकेत नोटीस बजावणी होऊनही हजर न झाल्याने मा.मे. उच्च न्यायालयाच्या न्यायधीश मा.शर्मिला देशमुख यांनी प्रदीप चौधरी यांना वॉरंट काढले व दि.०३/०३/२०२५ हजर राहण्याचा आदेश दि.१०/०२/२०२५ रोजी अॅड. शरद भोसले यांनी केलेला युक्तीवाद लक्ष्यात घेऊन दिला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मोहोळ तालुका सहकारी शिक्षण प्रसारक मंडळी लि. मोहोळ या सेवाभावी शैक्षणिक संस्थेचे प्रकरण मा.मे.उच्च न्यायालयांच्या सकृतदर्शनी बेकायदेशीर लोकांनी (शेख कुटूंबियांनी) बेकायदेशीर कब्जा घेण्यासाठी प्रत्यक्षात बदल न झालेले बोगस बदल अहवाल १९६५ ते २०१२ या ४७ या वर्षांचे व १९६५ ते२००३ या ३८ वर्षांचे तथाकथीत हिशोबपत्रके एकाच दिवशी दाखल केल्यामुळे श्रीमती शाहीन शेख यांचा सदर संस्थेशी कोणताही व कसलाही संबध नसल्याचे निदर्शनास आल्याने सदर संस्थेचा संपूर्ण कारभार व दप्तर काढून घेवून मा. प्रमुख जिल्हा



**हेच ते मा. मे. उच्च न्यायालयाच्या अवमान याचिकेत हजर न राहणारे मगरुर व मस्तवाल प्रदीप चौधरी**

न्यायाधिश, सोलापूर यांच्याकडे देण्याचा आदेशही दिलेला आहे. व तसेच शेख कुटूंबियांनी दाखल केलेल्या बोगस बदल अहवालवर निर्णयवर शिफारस (अहवाल) व १८/०७ या स्वयंखुद्द योजनेवर शिफारस (अहवाल) ६ महीन्याच्या आत मा. मे. उच्च न्यायालयाला धर्मादाय उपायुक्तांनी कळविण्याचा आदेश मा.मे.उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती मा.जे.एस. पटेल साहेब यांनी प्रलंबित पहीले अपिल क्रं. ६३२/१२ यामध्ये दि.१६/६/२०१७ रोजी दिला होता. परंतू प्रदीप चौधरी हे शासनाचा, तमुचा आमचा नोकर (अधिकारी) म्हणून काम करीत असताना सुध्दा श्रीमती शाहीन शेख व त्यांच्या वकीलांचा खाजगी नोकर असल्याप्रमाणे वागून मा.मे.उच्च न्यायालयाने दि.१६/६/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाचे जाणीवपूर्वक पालन केले नाही. म्हणून पांडूरंग सुरवसे, समाधान शेळके व नेताजी सुरवसे यांनी २०१९ मध्ये मा.मे. उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली आहे. १३३/२०१९ या अवमान याचिकेत सध्या बीड येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात धर्मादाय उपायुक्त म्हणून कार्यरत व असलेले प्रदीप चौधरी हे हजर न झाल्याने मा.मे. उच्च न्यायालयाच्या न्यायधीश मा.शर्मिला देशमुख यांनी प्रदीप चौधरी यांना वॉरंट काढून दि.०३/०३/२०२५ रोजी मा.मे. उच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दि.१०/२/२०२५ रोजी दिले आहेत. त्यामुळे मा.मे.उच्च न्यायालयाच्या अवमान याचिकेत हजर राहनाऱ्या अशा मगरुर व मस्तवाल अधिकाऱ्यास चाप बसेल.

# सोलापूरची विमानसेवा हवेतच; आणखीन तीन महिने वाट पाहा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ऐरणीवर आलेली सोलापूरची विमानसेवा अद्यापही सुरू झालेली नाही. यासाठी आणखीन तीन महिने वाट पाहण्याची वेळ सोलापूरकरांवर आली आहे. विमानसेवेबाबत अधिकारी व विमानसेवा कंपन्यांची मंगळवारी बैठक झाली.

राष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने 30 जानेवारी रोजी सोलापूर-मुंबई, सोलापूर-गोवा मार्गासाठी निविदा जाहीर केली आहे.




सोलापुरात विमानतळाची सुविधा असूनही विमानसेवा सुरू नसल्याने अनेकवेळा आंदोलन करण्यात आले. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत विमान सेवेवरून सत्ताधारी व विरोधकांत आरोप-प्रत्यारोप होत असताना, पंतप्रधान मोदी यांनी विमानतळ उद्घाटनाचा घाट घातला. त्यानंतर केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी डिसेंबरमध्ये विमानसेवा सुरू होईल, अशी घोषणा केली. परंतु अद्यापही विमानसेवा सुरू नसल्याने सोलापूरकर विमानसेवेबाबत गमतीची भाषा करीत आहेत.

यापूर्वी सोलापूर-मुंबई व सोलापूर-गोवाकरिता 42 सीटरच्या एअर क्राफ्ट विमानसेवेला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) परवागी दिली आहे. दरम्यान, राष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने विमानसेवेसाठी 30 जानेवारी रोजी निविदा प्रसिद्ध केली; परंतु काही विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांनी आक्षेप घेत 42 ऐवजी 72 एअरक्रॉप्ट विमानसेवेला परवानगी द्यावी, अशी मागणी केली. याबाबत अधिकारी आणि विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा होऊन अधिकाऱ्यांनी 72 एअरक्रॉफ्ट विमानसेवा अनुकुलता दर्शविल्याचे सांगण्यात येते. 15 मार्चपर्यंत निविदेची अंतिम मुदत असून, त्यानंतर लिलाव होणार आहे. त्यामुळे डिसेंबरमध्ये सुरू होणारी विमानसेवा मार्चमध्ये सुरू होण्याची शक्यता वर्तविण्यात येते. त्यामुळे सोलापूरची विमानसेवा आणखीन तीन महिने हवेत राहणार असल्याची चर्चा रंगली आहे.

# 'जलजीवन' नंतरही १५ जिल्ह्यांवर टंचाईचे संकट:

## २५ हजार गावांमधील कामे अर्धवट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील ४० हजार २९७ गावांमधील दीड कोटी कुटुंबांना 'हरघर जल' योजनेअंतर्गत जलजीवन मोहिमेमधून पिण्याच्या पाण्यासाठी नळ जोडणी दिली जाते. 'जलजीवन'च्या कामावर आतापर्यंत १५ हजार कोटींचा खर्च झाला आहे. तरीदेखील यंदाच्या उन्हाळ्यात पाणीपुरवठ्यासाठी १५ जिल्ह्यांमध्ये पाच हजारांवर टँकर लागतील, अशी स्थिती आहे. टंचाई आराखड्याद्वारे तशी मागणी राज्य सरकारला कळविली जात आहे.

(पान 2 वर..)

# वडाचीवाडी येथे नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर संपन्न







**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्रीहरी सार्वजनिक वाचनालय वडाचीवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर, छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालय, व डॉ. वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोफत नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीरात ५० जणांनी सहभाग नोंदविला. मोहोळ तालुक्यातील वडाचीवाडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर हे शिबिर पार पडले. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाच्या ही डॉ. निलेश बागूल, डॉ. रोहन सोमाणी, डॉ. प्रज्ञेश जलाल, डॉ. अजय, डॉ. अभिषेक, डॉ. गोविंद, कृष्णा व विश्वजीत या सर्वांनी तपासणी करून औषधोपचार केले. यावेळी श्रीहरी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पांडूरंग सुरवसे, सरचिटणीस व सुयश दूध संकलन केंद्रचे मालक नेताजी सुरवसे, रामेश्वर सुरवसे, माजी सरपंच बाळासाहेब डोंगरे, अशोक बचुटे, उपसरपंच अरुण म्हमाणे, गणेश म्हमाणे, अरुण डोंगरे आदींसह गावकरी मंडळी उपस्थिती होती. यावेळी डॉ. निलेश बागूल यांनी डोळ्यांची काळजी कशी घ्यावी आणि उपचार यासंदर्भात मार्गदर्शन केले. ते म्हणाल्या, प्रत्येकाने नियमित नेत्र तपासणी करून घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढे उपचार घ्यावेत, असे आवाहन केले.

# इलेक्ट्रो प्रदर्शन म्हणजे ग्राहकांसाठी मोठी पर्वणीच



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इलेक्ट्रो प्रदर्शन म्हणजे सोलापूरकरांसाठी मोठी पर्वणीच असून विविध कंपन्या एकाच छताखाली आल्याने त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सवलतीतील वस्तूंचा सोलापूरकरांनी लाभ घ्यावा. यातून ग्राहकांचा तर फायदा व्हावाच. परंतु, सोलापूर शहराचाही आर्थिक आलेख उंचावला जावा,अशी अपेक्षा महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी व्यक्त केली. वुधवारी, होम मैदान येथे सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशन अर्थात सेडाद्वारा इलेक्ट्रॉनिक्स, १२ ते १८ फेब्रुवारीदरम्यान स्वामी, सेडाचे उपाध्यक्ष सूरजरतन धूत, सुयोग कालाणी, परीक्षित रॉय, भूषण भुतडा आदींची प्रमुख उपस्थिती होती.आयोजित कॉम्प्युटर, टेलिकम्युनिकेशन, होम अप्लायन्सेस, सोलार सिस्टम,फिटनेस इक्विपमेंटसचे भव्य प्रदर्शन 'इलेक्ट्रो २०२५' चे उद्घाटन आयुक्त तेली-उगले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सेडाचे प्रेसिडेंट आनंद येमूल हे होते. याप्रसंगी शार्प इंडिया विजनेस सिस्टम्सचे हेड वसंत जोशी, महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, एमएसईवीचे अधीक्षक अभियंता सुनील माने, इंजिनीअर अजय मेहता, एमआयटीचे आकाश यावेळी सेडाचे प्रेसिडेंट आनंद येमूल यांनी, इलेक्ट्रोचे हे रौप्यमहोत्सवी वर्षे असून २४ वषापूर्वी २० स्टॉल्सने सुरु झालेले हे प्रदर्शन आज जवळपास ३०० स्टॉलसच्यावर पोहोचल्याचे सांगतिले. तसेच इलेक्ट्रो चेअरमन दीपक मुनोत यांनी यंदा क्यूआर कोडद्वारे सर्व सहभागी स्टॉल्सची माहिती ग्राहकांना आपल्या मोईबालवर पाहण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आल्याचे नमूद केले. तसेच काही स्टॉल्स सामाजिक संघटनांना विनामूल्य देण्यात आली असून या प्रदर्शनात खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसे व शेवटच्या सातव्या दिवशी दिवसांत खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी वंपर ड्रॉमध्ये आकर्षक वक्षिस असल्याची घोषणा करण्यात आली.या कार्यक्रमास सह सचिव हरीश कुकरेजा, खजिनदार सुयोग कालाणी, संस्थेचे माजी अध्यक्ष सतीश मालू, आनंदराज दोशी, दिलीप राऊत, समीर गांधी, विपीन कुलकर्णी, जितेंद्र राठी, कौशिक शाह, खुशाल देढीया, ईश्वर मालू तसेच संचालक संदेश कोठारी, राजेश जाजू, चंद्रकांत शाहपुरे, रवी पाचलगे, बसबराज नवले, यल्लपा भोसले, गणेश

सूत्रावे, सदस्य विजय टेके, पवन मुंदडा, सचिन करवा, दत्तात्रय अंबुरे, जॉय छावरिया यांच्यासह ग्राहक उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थिताचे आभार सूरजरतन धूत यांनी मानले.

**'इलेक्ट्रो'च्या पुस्तिकेचे प्रकाशन**

'इलेक्ट्रो २०२५' या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त काढण्यात आलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. केक कापून आनंदही साजरा करण्यात आला. तसेच प्रदर्शनासाठी सहकार्य करणाऱ्या पुण्याच्या सुनील लोखंडे यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

# आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयात अधिकचे पैसे मागितल्यास क्यूआर कोड वर तक्रार नोंदवा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे दाखले उतारे व अन्य प्रमाणपत्रे ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयातून दिले जातात. परंतु बऱ्याचदा आपले सरकार केंद्र अथवा सेतू कार्यालयात विविध दाखले, उतारे व प्रमाणपत्रे काढण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्तीकडून शासनाने विहित केलेल्या रकमेपेक्षा अधिकच्या रक्कमेची मागणी करण्यात येत असल्याची वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.




त्यामुळे सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्ती (एजंट) यांच्याकडून पैशाची मागणी होऊ नये अथवा झाल्यास तात्काळ तक्रार करता यावी यासाठी प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर (दफ)कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे, संबंधित नागरिकांनी हा किंवा कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार आहे.

हा क्यु आर कोड सोलापूर जिल्ह्यातील सर्व सीएससी सेंटर तसेच सेतू कार्यालय, तहसील कार्यालय आणि प्रांताधिकाऱ्यांच्या कार्यालयात लावण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रचालकांनी दाखल्या साठी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकची रक्कम मागणी केल्यास, दाखला विहीत मुदतीत दिला नाही अथवा विलंब केला तर, दाखल्या संदर्भात संबधिताला एसएमएस व्दारे माहिती न दिल्यास, एजंटाव्दारे संबधित नागरिकांकडे अधिकचे पैसे मागणी केल्यास अशा कोणत्याहीप्रकारच्या तक्रारी असल्यास नागरिकांनी यावर दिलेला क्यु आर कोड स्कॅन केल्यास त्यावर तात्काळ आपली तक्रार नोंदविली जाते. तसेच आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने चौकशी करुन पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे नागरिकांना कोणाला भेटण्याची अथवा अधिकचे पैसे देण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे नागरिकांनी जर असे प्रकार कोठे घडत असतील तर जिल्हा प्रशासनाने क्यू आर कोड स्कॅन करून तक्रार नोंदवणीच्या दिलेल्या अद्यावत सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

**क्यू आर कोड वर आठ तक्रारी प्राप्त-**

हा क्यु आर कोड कोणत्याही मोबाईल पवरून स्कॅन करून नागरिकांना सुलभरित्या तक्रार नोंदविण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आज दिनांक 13 फेब्रुवारी 2025 रोजीपर्यंत एकुण 8 तक्रारी क्यु आर कोड द्वारे नोंदविल्या गेलेल्या आहेत. या तक्रारीमधील 1 तक्रारीबाबत अर्जदार यांना कळविणेत आले आहे. उर्वरीत प्रकरणांबाबत चौकशी अहवाल प्राप्त करून तक्रारीत तथ्य आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

**तक्रारींचा तपशिल:-**

उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, माढा, या तहसिल कार्यालयांकडे प्रत्येकी एक तक्रार अर्ज प्राप्त झाली असून, तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूरकडे एक अर्ज प्राप्त झाला असून तक्रार अर्ज हा आपले सरकार सेवा केंद्राच्या सेवाबाबत संबंधित नसल्याने सदरचा तक्रार अर्ज तहसिलदार दक्षिण सोलापूर यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. व तहसिल कार्यालय बार्शी कार्यालयाकडे 2 अर्ज असे एकूण आठ अर्ज प्राप्त झाले असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.




## संपादकीय

# शाळेत अमली पदार्थांचा शिरकाव

अमली पदार्थांचा तरुणाईला पडलेला विळखा ही अतिशय गंभीर बाब असून, दुर्दैवाने त्याचा प्रसार आता शालेय जीवनाकडे होत आहे ही अतिशय चिंताजनक गोष्ट आहे. यासाठी शासन, पोलीस यंत्रणा, पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे या सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. गुटखा, तंबाखू, सिगारेट या व्यसनातून सुटका होणे कष्टसाध्य आहे; पण अमली पदार्थांपासून सुटका होणे हे अतिशय दुर्मिळ आहे. अगदी पान मसाला, मावा, तंबाखू, जर्दा, व्हाइटनर, पेट्रोल-डीझेलचा वास घेणे, विशिष्ट प्रकारची खोकल्याच्या औषधांचे सेवन, विक्स आयोडेक्स यांसारखे पदार्थ ब्रेडला लावून खाणे यापासून सुरू होणारा प्रवास हा नकळत गांजा, अफू, भांग, कोकेन, मोर्फिन, एलएसडी, ब्राउन शुगर, मेफेड्रोन, हेरोइन इथपर्यंत कधी पोहोचतो हे कळत नाही.

पूर्वी महाविद्यालयीन वयात याचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसत होता; पण, दुर्दैवाने आता शालेय वयामध्ये याने शिरकाव केला आहे. यासाठी नक्की काय करावे या विचारात शिक्षक, पालक, समुपदेशक, डॉक्टर्स यांनासुद्धा प्रश्न पडला आहे. आई-वडील जर सिगारेट, तंबाखू अशी व्यसने करत असतील किंवा घरात येणारी काम करणारी बाई जर तंबाखू किंवा मिश्री लावत असेल तर घरातील लहान मुलांमध्ये लहान वयातच या गोष्टींबद्दल आकर्षण निर्माण होते.

एकलकोंडेपणा वाढणे, स्वतःला एका रूममध्ये कोंडून घेणे, विशिष्ट वेळेस बाहेर जाण्यासाठी धडपडणे, पालक आणि शिक्षक यांच्याशी उद्धटपणे बोलणे, स्वभावात हिंसकपणा येणे, एखादी गोष्ट पाहिजे असल्यास त्यासाठी नको त्या पातळीवर जाऊन हट्ट करणे, मोबाइलला प्रतिबंध केल्यास तीव्र प्रतिक्रिया देणे. ही लक्षणे जर मुलांमध्ये जाणवली तर नक्की पालकांनी व शिक्षकांनी याकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे.

विशिष्ट पान टपऱ्यांवर आणि काही ठराविक ठिकाणी हे पदार्थ उपलब्ध असतात आणि त्या प्रत्येकाला कोडवर्ड दिलेला असतो. जो कोड वर्ड... घेणाऱ्याला आणि विकणाऱ्याला माहिती असतो. या सर्वांचे व्हॉट्सॲप ग्रुपही अलीकडील काळात निर्माण झाले आहेत. दर महिन्याला हे कोडवर्ड बदलले जातात आणि त्याची माहिती ग्रुपवर पाठवली जाते. उदाहरणार्थ, बटन म्हणलं की ब्राउन शुगर मिळते. म्याऊ म्याऊ म्हटलं की मेफेड्रोन मिळते.

**उपाय काय?**

- शासन, शैक्षणिक संस्था, प्रसारमाध्यमे, शिक्षक, पालक, डॉक्टर, समुपदेशक, पोलीस यंत्रणा या सर्वांनी एकत्रित येऊन या विषयावर गंभीरपणे विचार करून काम करणे अत्यावश्यक आहे.
- हा राक्षस आता आपल्या घरापर्यंत येऊन पोहोचला आहे. मुलांइतकेच किंवा काही प्रमाणात जास्त मुलींमध्येसुद्धा याचा शिरकाव झाला आहे.
- मुलांची सातत्याने स्नेहसंवाद ठेवणे. मुलांचे मित्र, छंद, त्यांचा दिनक्रम याची माहिती ठेवणे.
- मुलं ही पालक व शिक्षक यांना आदर्श मानतात. त्यामुळे मुलांमध्ये नकारात्मक संदेश जाईल असे वर्तन न करणे.
- यामध्ये कायद्यानुसार जी शिक्षा आहे, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी त्यात सुधारणा करणे.
- यामध्ये लाखो करोडो रुपयांचे व्यवहार होत असतात त्यामुळे त्याच्याशी लढण्यासाठी आपल्याला खूप ताकतीने काम करावे लागणार आहे.

काही शाळांमध्ये प्राथमिक वर्गातसुद्धा मुलांना या गोष्टीकडे आकर्षण करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे खाऊ चॉकलेट्स ही शाळांच्या बाहेर उपलब्ध आहेत. मुले ती खातात. त्याच्यात काही प्रमाणामध्ये अमली पदार्थ असतात आणि मग अगदी छोट्या वयातसुद्धा मुलांना व्यसन लागते.

**नव्या प्रकारचे अमली पदार्थ**

आपल्याकडे शालेय वयोगटातील मुले असोत किंवा नसोत, तरीही हा संदेश सर्व पालकांपर्यंत पोहोचवावा. सध्या शाळांमध्ये एक नवीन आणि धोकादायक अमली पदार्थ पसरत आहे. याला स्ट्रॉबेरी क्विक किंवा स्ट्रॉबेरी मेथ असे म्हणतात. हे क्रिस्टल मेथ नावाचे ड्रग असून, ते दिसायला आणि चवीलाही स्ट्रॉबेरी पॉप रॉक्स (तोंडात फुटणाऱ्या गोड कँडीसारखे) यांसारखे असते. हे ड्रग मुलांना कँडीच्या स्वरूपात शाळेच्या आवारात वाटले जात आहे. त्यामुळे अनेक निष्पाप मुले हे गोड पदार्थ समजून खात आहेत आणि त्यांना गंभीर स्वरूपाच्या समस्या उद्भवत आहेत. काही मुले तर तातडीने रुग्णालयात दाखल केली जात आहेत. हे केवळ स्ट्रॉबेरी चवीलाच नाही, तर चॉकलेट, पीनट बटर, कोला, चेरी, द्राक्ष आणि संत्री अशा विविध फ्लेवर्समध्येही आढळते. म्हणूनच, पालकांनी आपल्या मुलांना समज द्यावी की कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून कँडी किंवा खाण्याचे पदार्थ स्वीकारू नयेत. तसेच, मित्राने दिले तरीही खात्री न करता ते ताबडतोब शिक्षक, मुख्याध्यापक किंवा इतर जबाबदार व्यक्तीकडे द्यावे.

पान १ वरून

## 'जलजीवन' नंतरही...

केंद्र सरकारच्या 'हर घर नल' योजनेतून प्रत्येक घराला प्रतिमाणसी नळाद्वारे ५५ लिटर पाणी देण्यासाठी जलजीवन मोहिमेचे काम हाती घेण्यात आले. योजनेला २०१९ मध्ये सुरुवात झाली होती. तिचा कालावधी २०२४ मध्येच संपला. पण कामे अपूर्ण राहिल्याने २०२८ पर्यंत मुदतवाढ द्यावी लागली.

तोपर्यंत टंचाई काळात विशेषतः: उन्हाळ्यातील पाणीपुरवठ्यासाठी टँकरवर कोट्यवधींचा खर्च करावा लागेल, अशी परिस्थिती राज्यात आहे. २३४ गावांमध्ये अजूनही कामे सुरू झालेली नाहीत. सुमारे १६ हजार ९४ गावांमधील कामे निधीअभावी कमी-अधिक प्रमाणात सुरु असल्याचे योजनेच्या अहवालात नमूद केलेले आहे तर ४० हजार २९७ गावांपैकी आतापर्यंत ११ हजार ८९२ गावांनीच नळ जोडणी पूर्ण झाल्याचे कळविले आहे.

राज्यातील सुमारे २८ हजार गावांमधील 'जलजीवन' अजूनही अर्ध्यावरच आहे. त्यासाठी ठेकेदारांकडून विलंब, कामांबद्दल तक्रारी, ठेकेदारांची बिले प्रलंबित आणि राज्य सरकारकडे निधी उपलब्ध नसल्याच्या बाबी कारणीभूत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**प्रबोधन**

# मृत्यू हे सत्य ! पुनर्जन्म हे असत्य !

आयुष्याचं बरं-वाईट होणं, हे का कोणाच्या हातात असतं? जे होणार ते होणारच! असं म्हणणं, हा दैववादीपणा आहे. जे झालं ते झालं, हा विचार मात्र वास्तववादी आहे. वेळ, प्रसंग, आपला व्यवहार आणि परिस्थिती यांच्या संयोगातून जे घडतं, ते स्वीकारणं आणि तेव्हा कोणती कारणं प्रबळ ठरली याचा शोध घेणं, म्हणजेच डोळसपणे जगणं. हे सर्व एवढ्यासाठीच सांगितलं की, माज्यावर पितृतुल्य प्रेम असणारे केरबा काका पंढरपुरात एका भीषण अपघातात द्वादशी दिवशी मरण पावले. स्वामी समर्थांच्या घोड्याने गजानन महाराजाच्या हत्तीच्या सोंडेवर लाथ मारली. हत्ती रागावला. थैमान घालू लागला आणि त्याच्या पायाखाली आपण चिरडले जाणार, या भीतीने गोपाळपुराच्या पुलावरून उडी मारणारे केरबा काका मृत्युमुखी पडले. ही दुर्घटना पाच वर्षांपूर्वी आषाढी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी घडली. ५० वर्षं अत्यंत निष्ठेने आषाढी- कार्तिकीच्या वाऱ्या, निर्जला एकादशा, ज्ञानेश्वरीचे जन्मभर पारायण, गावच्या पांडुरंगाला नैवेद्याचं रोज अर्पण, मांस-मच्छी-मद्य-व्यवविरहित पवित्र आचरण करणाऱ्या अशा निष्ठावंत, श्रद्धावंत भाविकाच्या वाट्याला आलेलं हे मरण अस्वस्थ करणारं होतं. नशीबवादी म्हणतील, त्यांच्या नशिबी तसं लिहिलंच होतं. पण तो केवळ अपघाती मृत्यू होता. असा मृत्यू कोणाचाही, कोठेही होऊ शकतो. नशीब, भोग सारं झूट असतं!'

केरबा काका हे वारकरी होते. तसेच ते स्वामी समर्थांचे आणि गजानन महाराजाचेही भक्त होते. पण हे दोघे महाराज आणि दयानिधान विठ्ठल या तिघांपैकी कुणीही याप्रसंगी त्यांना भिऊ नको, मी तुज्या पाठीशी आहे आणि मी तुला वाचवणार आहे, असं म्हटलंही नाही. संकटाची सूचना तरी द्यावी, तेही नाही. त्यांचे मित्र मात्र वाचले. तेव्हा दीड शहाण्या संपादकांनी शीर्षक (रेडिमेड) टाकलं, देव तारी त्याला कोण मारी! अशा म्हणी मेंदू कुजवणाऱ्या असतात. त्यातलीच ही एक आहे.

देव ही कल्पना खरी मानणारे काहीही म्हणोत. पण देव खोटा, धर्म खोटा असं जाहीर करणाऱ्या संत एकनाथांना विचारा, जगात देव नाही, अशी साक्ष ते देतील. स्वतः श्रीकृष्ण, श्रीराम हे म्हणे विष्णूचे अवतार! मग त्यांचे मृत्यू कसे झाले? संशोधकांच्या मतानुसार, श्रीकृष्णाला पारध्याचा विषारी बाण लागला आणि त्यामुळे ते एकाकी अवस्थेत जंगलात मरण पावले. श्रीराम हे सीतेच्या अखेरच्या वियोगाने शरयू नदीत जलमग्न होऊन मृत्यू पावले. बुद्ध हेही विष्णूचे अवतार! त्यांचा मृत्यू अन्नाच्या विषबाधेने अतिसार होऊन झाला. स्वतःला पंचकृष्णांपैकी एक मानणाऱ्या चक्रधरांचा मृत्यू कसा झाला? देवगिरीच्या हेमाडपंताच्या मारेकऱ्यांनी अकोल्याच्या तळ्याकाठी सायंकाळी त्यांचा शिरच्छेद केला. हा इतिहास देव तारी त्याला कोण मारी, ही म्हण खोडून टाकणारा आहे. त्याचबरोबर पूर्वजन्म, पुनर्जन्म, संचित, भाग्य ही गचाळ शब्दसंहितासुद्धा मोडीत काढली पाहिजे. कारण जर कृष्ण हा रामाचा अवतार होता, तर त्याने पूर्वी पाप केलं म्हणून अपघाती मृत्यू झाला, असं म्हणावं काय? वास्तव दाहक असेल, चटके देणारं असेल; पण सत्य म्हणून ते आपण स्वीकारलंच पाहिजे. सामान्य माणसं मरतात तसेच वरील महापुरुषांचे मृत्यू झाले आहेत.

समाधीचे विविध प्रकार सांगणारे एक विद्वान भेटले. म्हणे, तुकारामांनी वायूसमाधी घेतली. समाधीचा हा प्रकार कोणालाही नवाच वाटेल. या समाधीचा खरा अर्थ मात्र हत्या अथवा आत्महत्या हाच आहे. संजीवन समाधी घेणाऱ्याचा मृत्यू होत नसेल, तर श्रीराम, श्रीकृष्ण यांना ती माहीत नव्हती काय? गीतेवरून ज्ञानेश्वरी रचणाऱ्या ज्ञानेश्वरांनाच ती माहीत होती, असं म्हणायचं, तर मग योगेश्वर कोण ? श्रीकृष्ण की संत ज्ञानेश्वर? या साऱ्या गोष्टींचा साकल्याने, तारतम्याने आणि तर्कशुद्ध बुद्धिनिष्ठेने विचार करायला आपण कधी शिकणार? महात्मा गांधीजींना त्यांचा आतला आवाज मार्गदर्शन करत असेल, तर ते नथुराम गोडसेच्या गोळीचे बळी का झाले? मग १२५ वर्ष जगणार या शब्दांचा अर्थ काय घ्यायचा? हा आतला आवाज हेदेखील थोतांडच!

थोडक्यात काय तर, राम-कृष्णापासून केरबा काकांपर्यंत साऱ्यांचे मृत्यू हे मानवी मृत्यूच होते. जन्मणारा मनुष्य मरतो, हे त्रिवार सत्य! मात्र मेलेला पुन्हा जन्मतो, हे मात्र खोटंच! मृत्यू सर्वांना आहे. त्याची पूर्वतयारी असेल तर तो सुसह्य असतो. तो अनपेक्षित, अचानक असेल, तर अस्वस्थ करतो. त्यावेळीही वास्तवाचा स्वीकार व्हावा. कारण-

घडीचाही नाही । भरवसा येथे
कधी न कळते । मृत्यूवेळ ॥१
तयारी पाहिजे । केव्हाही जाण्याची
तेथे पयार्याची। सोय नाही ॥२
कधीही आळस। नको तो म्हणून
कामे करा पूर्ण। घाईघाई ॥ ३
मुला-माणसांची। लावावी व्यवस्था
खातील न खस्ता । असे करा ॥४
शंभर वर्षांचे। करा नियोजन
शक्य ते ते पूर्ण । करा पाहू ॥५
वात्सल्याने ज्यांना आहे जपलेले
त्यांचे करा भले मृत्यूपूर्वी ॥६
समाधानी मृत्यू । साधायचा तर
कामाचे डोंगर । उभे करा ॥७
नाहीतर पशू । तुम्हा म्हणावे का?
स्वतः साठी नका । जगू कधी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

**प्रबोधन**

# आयुष्याचं बरं-वाईट होणं, हे का कोणाच्या हातात असतं?

जे होणार ते होणारच! असं म्हणणं, हा दैववादीपणा आहे. जे झालं ते झालं, हा विचार मात्र वास्तववादी आहे. वेळ, प्रसंग, आपला व्यवहार आणि परिस्थिती यांच्या संयोगातून जे घडतं, ते स्वीकारणं आणि तेव्हा कोणती कारणं प्रबळ ठरली याचा शोध घेणं, म्हणजेच डोळसपणे जगणं. हे सर्व एवढ्यासाठीच सांगितलं की, माज्यावर पितृतुल्य प्रेम असणारे केरबा काका पंढरपुरात एका भीषण अपघातात द्वादशी दिवशी मरण पावले. स्वामी समर्थांच्या घोड्याने गजानन महाराजाच्या हत्तीच्या सोंडेवर लाथ मारली. हत्ती रागावला. थैमान घालू लागला आणि त्याच्या पायाखाली आपण चिरडले जाणार, या भीतीने गोपाळपुराच्या पुलावरून उडी मारणारे केरबा काका मृत्युमुखी पडले. ही दुर्घटना पाच वर्षांपूर्वी आषाढी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी घडली. ५० वर्षं अत्यंत निष्ठेने आषाढी- कार्तिकीच्या वाऱ्या, निर्जला एकादशा, ज्ञानेश्वरीचे जन्मभर पारायण, गावच्या पांडुरंगाला नैवेद्याचं रोज अर्पण, मांस-मच्छी-मद्य-व्यवविरहित पवित्र आचरण करणाऱ्या अशा निष्ठावंत, श्रद्धावंत भाविकाच्या वाट्याला आलेलं हे मरण अस्वस्थ करणारं होतं. नशीबवादी म्हणतील, त्यांच्या नशिबी तसं लिहिलंच होतं. पण तो केवळ अपघाती मृत्यू होता. असा मृत्यू कोणाचाही, कोठेही होऊ शकतो. नशीब, भोग सारं झूट असतं!'

केरबा काका हे वारकरी होते. तसेच ते स्वामी समर्थांचे आणि गजानन मृत्यू हे सत्य हे सत्य! पुनर्जन्म हे असत्य महाराजाचेही भक्त होते. पण हे दोघे महाराज आणि दयानिधान विठ्ठल या तिघांपैकी कुणीही याप्रसंगी त्यांना भिऊ नको, मी तुज्या पाठीशी आहे आणि मी तुला वाचवणार आहे, असं

म्हटलंही नाही. संकटाची सूचना तरी द्यावी, तेही नाही. त्यांचे मित्र मात्र वाचले. तेव्हा दीड शहाण्या संपादकांनी शीर्षक (रेडिमेड) टाकलं, देव तारी त्याला कोण मारी! अशा म्हणी मेंदू कुजवणाऱ्या असतात. त्यातलीच ही एक आहे. देव ही कल्पना खरी मानणारे काहीही म्हणोत. पण देव खोटा, धर्म खोटा असं जाहीर करणाऱ्या संत एकनाथांना विचारा, जगात देव नाही, अशी साक्ष ते देतील. स्वतः श्रीकृष्ण, श्रीराम हे म्हणे विष्णूचे अवतार! मग त्यांचे मृत्यू कसे झाले? संशोधकांच्या मतानुसार, श्रीकृष्णाला पारध्याचा विषारी बाण लागला आणि त्यामुळे ते एकाकी अवस्थेत जंगलात मरण पावले. श्रीराम हे सीतेच्या अखेरच्या वियोगाने शरयू नदीत जलमग्न होऊन मृत्यू पावले. बुद्ध हेही विष्णूचे अवतार! त्यांचा मृत्यू अन्नाच्या विषबाधेने अतिसार होऊन झाला. स्वतःला पंचकृष्णांपैकी एक मानणाऱ्या चक्रधरांचा मृत्यू कसा झाला?

देवगिरीच्या हेमाडपंताच्या मारेकऱ्यांनी अकोल्याच्या तळ्याकाठी सायंकाळी त्यांचा शिरच्छेद केला. हा इतिहास देव तारी त्याला कोण मारी, ही म्हण खोडून टाकणारा आहे. त्याचबरोबर पूर्वजन्म, पुनर्जन्म, संचित, भाग्य ही गचाळ शब्दसंहितासुद्धा मोडीत काढली पाहिजे. कारण जर कृष्ण हा रामाचा अवतार होता, तर त्याने पूर्वी पाप केलं म्हणून अपघाती मृत्यू झाला, असं म्हणावं काय? वास्तव दाहक असेल, चटके देणारं असेल; पण सत्य म्हणून ते आपण स्वीकारलंच पाहिजे. सामान्य माणसं मरतात तसेच वरील महापुरुषांचे मृत्यू झाले आहेत.

समाधीचे विविध प्रकार सांगणारे एक विद्वान भेटले. म्हणे, तुकारामांनी वायूसमाधी घेतली. समाधीचा हा प्रकार कोणालाही नवाच वाटेल. या समाधीचा खरा अर्थ मात्र हत्या अथवा आत्महत्या हाच आहे. संजीवन समाधी घेणाऱ्याचा मृत्यू होत नसेल, तर श्रीराम, श्रीकृष्ण यांना ती माहीत नव्हती काय? गीतेवरून ज्ञानेश्वरी रचणाऱ्या ज्ञानेश्वरांनाच ती माहीत होती, असं म्हणायचं, तर मग योगेश्वर कोण? श्रीकृष्ण की संत ज्ञानेश्वर? या साऱ्या गोष्टींचा साकल्याने, तारतम्याने आणि तर्कशुद्ध बुद्धिनिष्ठेने विचार करायला आपण कधी शिकणार?

महात्मा गांधीजींना त्यांचा आतला आवाज मार्गदर्शन करत असेल, तर ते नथुराम गोडसेच्या गोळीचे बळी का झाले? मग १२५ वर्ष जगणार या शब्दांचा अर्थ काय घ्यायचा? हा आतला आवाज हेदेखील थोतांडच! थोडक्यात काय तर, राम-कृष्णापासून केरबा काकांपर्यंत साऱ्यांचे मृत्यू हे मानवी मृत्यूच होते. जन्मणारा मनुष्य मरतो, हे त्रिवार सत्य! मात्र मेलेला पुन्हा जन्मतो, हे मात्र खोटंच! मृत्यू सर्वांना आहे. त्याची पूर्वतयारी असेल तर तो सुसह्य असतो. तो अनपेक्षित, अचानक असेल, तर अस्वस्थ करतो. त्यावेळीही वास्तवाचा स्वीकार व्हावा. कारण-

घडीचाही नाही । भरवसा येथे
कधी न कळते । मृत्यूवेळ ॥१
तयारी पाहिजे । केव्हाही जाण्याची
तेथे पयार्याची। सोय नाही ॥२
कधीही आळस । नको तो म्हणून
कामे करा पूर्ण । घाईघाई। ३
मुला-माणसांची। लावावी व्यवस्था
खातील न खस्ता । असे करा ॥४
शंभर वर्षांचे। करा नियोजन
शक्य ते ते पूर्ण । करा पाहू ॥५
वात्सल्याने ज्यांना आहे जपलेले
त्यांचे करा भले । मृत्यूपूर्वी ॥६
समाधानी मृत्यू । साधायचा तर
कामाचे डोंगर । उभे करा ॥७
नाहीतर पशू । तुम्हा म्हणावे का?
स्वतः साठी नका । जगू कधी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# काँग्रेसमुक्त नव्हे तर, शोषणमुक्त भारत घडवू या !

आजगाच्या पाठीवर भारतीय लोक सतत संघर्षाच्या लाटा अंगावर घेऊन पुढे वाटचाल करीत आहे. नाव सतत डगमळत असताना, आता ती स्थिर पाण्याचे प्रवाहात पुढील प्रवासासाठी सोडण्याची गरज निर्माण झाली? भारत देश अनेक संकटांना तोंड देऊन, महाशक्ती बनण्याचे स्वप्न पाहत आहे. भारताची प्रगती भांडवल निर्मितीतून जरी होत असेल तरी ती एका कष्टाळू वर्गाच्या शोषणातून होत आहे, याचा सुद्धा विचार करावा लागेल ? आणि भारत देश जर महाशक्ती होत असेल ?, तर तो सुद्धा कोणाचे तरी रक्त आटवून होत आहे , हे सुद्धा नाकारता येणार नाही ?. परकीयांच्या तावडीतून भारत देश स्वतंत्र होण्यासाठी काँग्रेस राजवट तयार झाली. स्वतंत्र झालेल्या भारत देशात 26 जानेवारी 1950 ला प्रजासत्ताक दिनाच्या निमित्याने गाजावाजा सुरू झाला.

पुढील काळात त्याच काँग्रेस पक्षाने पहिल्या घटना दुरुस्तीतून 18 जून 1951 ला कष्टकरी वर्गाच्या शोषणातून भारताच्या प्रगतीची वाटचाल सुरू केली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दुटप्पी धोरणाने आज पुन्हा देशावर गंडांतर आले. आज भाजपचे सरकार काँग्रेस मुक्त भारत , नारा देत आहे., हा नारा सुद्धा अतिशय स्वार्थातून तयार झालेला दिसतो आहे. कालमानानुसार देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक राजवटीत एक - एक चळवळ उभी होत असते. काँग्रेस राजवटीत स्वातंत्र्याची चळवळ उभी झाली. काँग्रेस राजवटीनंतर , हिंदू धमार्ची व हिंदूराष्ट्राची चळवळ उभी करण्यात आर.एस.एस. ला व भाजपाची वाटचाल असल्याचे दिसत आहे? खरे तर भारताच्या पृष्ठभूमीवर आर्थिक स्वातंत्र्याची चळवळ उभी करून, देश पातळीवर केंद्रातील कायदे व आर्थिक धोरणे बदलविण्याची गरज निर्माण झाली. याकडे मात्र केंद्र सरकारचे सतत दुर्लक्ष आहे ? आणि आता तर भारत देशासाठी आर्थिक स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करण्याची वेळ येऊन ठेपली. भारतीय युवा शक्तीची ती गरज तयार झाली. स्वातंत्र्या नंतरचे काळात गेल्या 75 वर्षात, जर 75 वेळा घटनादुरुस्ती करून बदल केला असेल , तर याचा अर्थ असा की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूळ संविधान तयार केले होते, ते आता कुठेच जागेवर राहिले नसेल, असे आता सामान्य जनतेला वाटत आहे ? म्हणजेच जनतेला हा प्रश्न सुद्धा आता गांभीयार्ने घ्यावा लागेल ? स्वातंत्र्या नंतर काळे इंग्रज हाकलले आणि आता तर समाजवादी व्यवस्थेतून गोरे इंग्रज, म्हणजे स्वकीय विरोधकच तयार झालेत .

सत्तेतून पैसा व पैशाचा वापराने लोकांची मानसिकता बिघडविणे हा भ्रष्टाचारी मार्गाने प्रचंड बोफोर्स वाढवीला गेला. राजकीय पक्षांनी स्वतःच्या हितासाठी, तोडफोड करून, स्वतःसाठी कायदे तयार केले. सामान्य माणसांनी ज्या पक्षाला, किंवा ज्या व्यक्तीला मतदान केले असेल, तो व्यक्ती दुसऱ्याच पक्षात जाऊन बसतो. हा तर मतदाराचा घोर अपमान होत आहे. या शोषणाच्या लुटमारीतूनच सत्तेच्या चाव्या, हातात येण्यासाठी, सत्ताधीशांनी व राज्यकर्त्यांनी जातीचे समीकरणे मांडली व जातीच्या समीकरणातूनच धर्मवाद तयार झाला. आणि तो धर्मवाद जवळपास सर्वच धर्मवाद्यांनी जोपासला. आणि त्याला राजनीतीचे प्राधान्य देऊन अमलात आणला. सत्तेच्या चाव्या खिशात ठेवण्यासाठी हिंदूच्या नावावर शिवाजी महाराज लोकांच्या डोळ्यासमोर आणला? प्रत्येक जाती-धर्माच्या मंडळींनी आपापला थोर पुरुष व संत महात्म्याचे नाव घेऊन आपली वैयक्तिक राजकीय दुकानदारी वाढविली. कुठे तर सत्तेतून तिजोरी लुटण्यासाठी, शिवाजी महाराजांचे नाव घेऊन सत्तेचा खेळ चालू झाला. सर्वात मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला तो, हिंदूराष्ट्राच्या निर्मितीवर शोषित जनतेचे पोट भरनार आहे कां ? शोषित जनतेचे प्रपंच जातीच्या व धर्माच्या नावावर चालत असेल? तर याचे उत्तरच हिंदूराष्ट्रवाद्यानी द्यावें?

ग्रामीण भागातील लोक जीवन जगत असताना बारा बलुतेदार पद्धत ही पारंपरिक होती. तर ती धर्मवादाला धरून नव्हती तर ती अर्थवादी व्यवस्था होती. बारा बलुतेदार पद्धतीत प्रत्येकांचे व्यवसाय वेग- वेगळे होते. आणि त्या व्यवसायातून देवाण-घेवांन होत असे. त्याही अगोदरच्या प्राचीन काळात धान्याची कोठारे लुटण्या साठी दरोडे पडायची व त्याच दरोड्यातून सरदार






तयार झाले. आता स्वातंत्र्यानंतर जनतेच्या कष्टाच्या पैशातून तिजोरी लुटण्यासाठी आमदार- खासदार तयार झाले.? याच शासन चोरांच्या सभेला मोठं - मोठी गर्दी व्हायला लागली. आणि आजची जनता या चोरांच्या सभेला जाऊन त्यांचेच पाठीराखे झाले? आणि हेच लुटारू परिवर्तनाची भाषा करायला लागले आणि देश लुटायला लागले. आणि वेगवेगळी आम्मिषे देवून यांच्या भूल थापांना, समाज बळी पडत चालला. निवडणुकीचे काळातील जाहीरनामा, वचननामा हे धुळखात पडले आहेत. हे फक्त बोलाची भात आणि बोलाची कढी तयार झाली. सत्तेच्या बळावर पंजाब, हरियाणा, दिल्लीच्या तक्तावर, नुसता शेतकरी वर्ग नामोहरम करणे चालू झाले. साम-दाम- दंड-भेद वापरून शेतकऱ्यांचा आवाज दाबता येईल, तेवढा दाबण्याचा प्रयत्न सुरू झाले. म्हणजे शेतकऱ्यांनी आवाज उठवू नये, यांनी गुलामगिरीत व लाचारीत जगावे ही आजची लोकशाही सांगत आहे,ती फक्त लोकशाहीच्या नावावर दडपशाही चालू आहे.


आपण कोठून निघालो, कशासाठी निघालो होतो? व आता कोठे जाऊन फसलो?, याचे चिंतन व मननं आता मतदारांना करावें लागेल?, शोषणाची व्यवस्था ही केंद्राच्या धोरणात फस लेली आहे. कारण पुढील व्यवस्था ही सर्व मतदानाच्या प्रक्रियेतून राबविल्या जात आहे, आणि ती तर आता ई.व्हीं. एम.मशीन मधून घडविल्या जात आहे. कोणत्याही मशीनचे चालक व दुरुस्ती करणारे हे मेकॅनिकल असतात. व त्या मशीन मध्ये खोडतोड करणे, दुरुस्ती करणे हा आता भ्रष्टाचारी व्यवस्थेचा भाग बनला आहे? मानवनिर्मित मशीन ही सदोष की निर्दोष हा पुन्हा, पूनर्वीचार करावा लागेल? निवडणूक आयोग हे सुद्धा राजकीयांचे बाहुले तयार झाले ? ही परिणीती व व्यवस्था बदलण्याची जबाबदारी आता समाजावर येऊन ठेपली?

स्वातंत्र्याच्या अगोदर देशप्रिय व्यवस्था होती. देशप्रिय स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लाखो लोकांनी, आपल्या प्रपंचाची आहुती दिली. परकीयांच्या, इंग्रजांच्या तावडीतून देश स्वतंत्र करण्यासाठी, भगतसिंग, सुखदेव, चंद्रशेखर फासावर चढले. भारतीयांनी आपल्या जीवनाच्या राख रांगोळी केल्या? नंतर सत्तेच्या लालची पोटी शेतकरी- शेतमजुराच्या शोषणातून, औद्योगीकरण वाढविण्याची प्रक्रिया तयार झाली. ग्रामीण वाटचालीला पुढे न नेता शहरीकरणाची भरमसाठ वाढ केली . तिथेच देश पातळीवर अर्थवाद घाईस आला. समाजवादी व्यवस्थेतून आज धर्मवाद तयार झाला ,आणि तो हिंदू राष्ट्राच्या नावाने वाढला. काँग्रेस व बीजेपी हे दोन्ही शेतकर्यांचे विरोधी पक्ष भांडवलशाहीला जोपासणारे आहेत. आणि या दोन्ही पक्षाने शेतकऱ्यांचा आर्थिक वाद समूळ नष्ट केला, हे आता सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांचा राजकीय पक्ष या देशात उभा होऊ नये हीच काँग्रेस व बीजेपी या दोन्ही पक्षांनी आखलेली खून गाठ आहे. म्हणजेच भांडवलशाहीच्या कचाट्यातून शेतकरी- शेतमजुरांचे शोषण हे अजून थांबणार नाही तर, ते सतत वाढणार आहे?. नुकत्याच झालेल्या, हरियाणा, महाराष्ट्र व दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने हिंदूंच्या नावावर मते मागून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व भाजपाचे पितळ उघडे पडले आहे. काँग्रेस व बीजेपी या व्यतिरिक्त तिसरा शेतकरी पक्ष भारतीय पातळीवर उभा होऊ नये व त्यास राष्ट्रीय मान्यता मिळू नये यासाठी या दोन्ही पक्षाचे आटोकाट प्रयत्न चालू आहे. शेतकरी विचारधारा संपवून मंदिरे उभारून लूटमार चालू झाली.

दिल्लीच्या निवडणुकीत माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल वर भ्रष्टाचारी आरोप बीजेपी ने केलेत, त्यांना कैदेत सुध्दा डांबले? तेलंगणामध्ये के. कविता, तसेच हेमंत सोरेन झारखंड यांच्यावर सुद्धा अनेक भ्रष्टाचारी आरोप झालेत. याचा अर्थ संपूर्ण भारतात बीजेपी व त्यांचे आमदार- खासदार, मंत्र्यां नी, भ्रष्टाचार केला नाही असा होतो काय? महाराष्ट्रात सर्व भ्रष्टाचारी पाठीशी घालून सत्तेत येण्याचे कट कारस्थान हे तर भाजपानेच केले? जे स्वतः भ्रष्टाचाराच्या गटांगळात फसले आहे, त्यांनी इतरांवर आरोप करणे हे अतिशय गैर आहे ? याचाच अर्थ भाजपाच्या पक्षासी युती करणे व त्यात सामील होणे म्हणजे या देशातील सर्व भ्रष्टाचारी शुद्ध होणे. व कलंकित भ्रष्टाचारांना पाठीशी घालून कुंभमेळ्याचे गंगास्नान घालून त्यांना निर्दोष दाखविण्याचे स्वप्न भाजपा जनतेला दाखवीत आहे काय?. आज पक्षांमध्ये जमा झालेला फंड असेल तर तो भाजपाचा इतर राजकीयपक्षाचे तुलनेत सर्वात जास्त असलेला फंड जमा आहे . ज्या काँग्रेसने साठ वर्षे सत्तेत घालविले त्याहीपेक्षा संपूर्ण देशात भा.ज . पा ने माया जमा केली. गेली पंधरा वर्षात भाजपाचे आमदार-खासदारांचे उत्पन्न चौपटीवर गेले. मग सत्तेचे लुटारू कोण आहेत ? महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या काळात वेळेवर लाडकी बहीण योजना लागू करून मतदानासाठी अधिकृत पैसे महिलांच्या खात्यावर जमा करणे हा तर अधिकृत शासकीय भ्रष्टाचार महाराष्ट्रातील जनतेला दिसला.? विधानसभा महाराष्ट्राच्या 2024 निवडणुकीत सर्वात जास्त सोने, पैसा निवडणुकीत भरारी पथकांनी पकडून जप्त केला व तू पुन्हा शासन तिजोरीत जमा झाला. म्हणजेच भारतातील महाराष्ट्र हे किती भ्रष्टाचारी राज्य आहे हे सिद्ध झाले. म्हणजेच निवडणुकीच्या अगोदर सुद्धा भाजपाचे सरकार, महाराष्ट्रात होते व नंतरही भाजपाचे सरकार सत्तेवर आले? म्हणजेच याचा अर्थ " सत्तेपुढे शहाणपण चालत नाही " हे निर्वीवाद सत्य आहे.?

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व त्यानंतर शरद जोशी यांनी शेतकरी शेतमजुरांच्या आर्थिक शोषनावर, देश पातळीवर अर्थवाद मांडला.भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या धोरणामुळे देश महासत्तेच्या नावावर धर्मसत्तेकडे प्रस्थापित झाला, व आता हिंदूराष्ट्र निर्मितीकडे वाटचाल करीत आहे. महान तत्ववेत्यांचा अर्थवाद इथेच संपला. अर्थवाद संपवून धर्मवांद चालविण्याची कृती भारतभर चालू झाली. आज भारताने धर्मवाद जिंकला, अर्थातच अर्थवाद हरला ? पुन्हा अर्थवाद चालू होण्यासाठी, राबविण्यासाठी व भारताला पुनर महासत्ता बनविण्यासाठी आर्थिक धोरणाची वाटचाल करावी लागेल. अर्थवाद पुन्हा आपण उभा करू या? काँग्रेस मुक्त भारत ही गाढव कल्पना फक्त राजकीय अपेक्षेने धर्मवादाच्या नावावर समाजात रूढ झाली, आणि " शोषण मुक्त भारत " ही कल्पना मात्र वाऱ्यावर टांगल्या गेली ?. इथेच भारत देशाच्या महानतेची हानी झाली ?

आता पुन्हा " शेतकरी- वारकरी, कष्टकरी महासंघाच्या " वतीने शोषण मुक्त भारत घडवू या! काँग्रेसमुक्त नव्हे तर, शोषण मुक्त भारत घडवू या! समाजवादी व्यवस्थेतून धर्मवाद तयार झाला, व पुढे धर्मवादातून आता अर्थवादि धोरणाची कास धरू या!
पुन्हा आम्ही सारे भारतीय, एकत्र होऊन लढू या !
धर्मवाद हद्दपार करूया !
" जिंकू अथवा मरू ", भारत देश शोषणमुक्त करू ?
पुन्हा आर्थिक स्वातंत्र्यासाठी आता पेटवा मशाली? आता उठवू सारे रान......
" शोषण मुक्त भारत देश घडवू या ! "
जय हिंद, जय भारत!
जय जवान, जय किसान !!



**धनंजय रुपराव काकडे,**
(ज्येष्ठ साहित्यिक व सरसेनापती, शेतकरी आंदोलन समिती.)
9890368058.
अध्यक्ष- शेतकरी- वारकरी, कष्टकरी महासंघ.महाराष्ट्र

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# यंदा पहिल्यांदाच निघणार पारंपरिक वेशभूषेत महिलांची बाईक रॅली

## पाळणा सोहळ्यास पन्नास हजार पेक्षा जास्त महिला सहभागी होणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने पाळणा कार्यक्रम संदर्भात डाळींबी आड शिंदे चौक येथे बैठक पार पडली, यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष करून बैठकीस सुरुवात करण्यात आली.

यावेळी अनेक महिलांनी वेगवेगळ्यासूचना मांडल्या, तर शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष यांनी महिलांची बाईक रॅली संदर्भात सूचना मांडली, यावेळी सर्वांनी एकमताने सूचना मंजूर केली, यंदाच्या वर्षी 16 फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता पहिल्यांदाच महिलांची पारंपरिक वेशभूशेत बाईक रॅली निघणार आहे, उत्कृष्ट पारंपरिक वेशभूषा करणाऱ्या महिलांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे, यावेळी जनजगृती फलक महिलांच्या हातात असणार असून, जास्तीत जास्त महिलांनी या बाईक रॅली मध्ये पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे, असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाकडून करण्यात आले आहे, तसेच पाळणा कार्यक्रम हा अतिशय मोठया प्रमाणात होणार असून सर्व महिलांनी या पाळणा कार्यक्रमास सहकुटुंब सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, पुरुषोत्तम बरडे, लता ढेरे, सुनंदा साळुंखे, लता फुटाणे, मनीषा नलावडे, विजया काकडे, प्राजक्ता बागल, निर्मला शेळवने, सुनीता गरड, माधुरी चव्हाण, स्मिता घुले, दीपाली भोसले, उज्वला साळुंखे, यशोदा डेंगळे, जयश्री पवार, मोहिनी चटके, उत्तरा बचुटे, अर्चना बरडे, सुवर्णा यादव, प्रतीक्षा चव्हाण, जया रणदिवे, ऐश्वर्या गायकवाड, मंदाकिनी तोडकरी, प्रगती डोंगरे, शुभांगी चराटे, वैष्णवी सुरवसे, मनीषा माने, सारिका फुटाणे यांच्यासह महिला, तसेच शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरचा पारा ३७.३ अंशांवर: उन्हाळ्याची चाहूल; किमान तापमानातही वाढ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर व परिसरात आज ३७.३ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दुपारच्या सुमारास उन्हाचा चटका वाढल्याने उन्हाळ्याची चाहूल लागण्यास सुरवात झाली आहे. मंगळवारच्या तुलनेत आज सोलापूरच्या तापमानात १ अंशांची वाढ झाली आहे. सोलापुरात कमाल तापमानासोबतच किमान तापमानातही वाढ झाल्याने वातावरणातून थंडी गायब आणि उकाडा जाणवण्यास सुरवात झाली आहे. गेल्या चार दिवसांपासून सोलापूर शहर व परिसरात ३५ ते ३६ अंश सेल्सिअस दरम्यान कमाल तापमान होते. किमान तापमानाचा पारा २१ ते २२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहू लागला आहे. कमाल आणि किमान तापमानात वाढ झाल्याने वातावरणातून थंडी आता जवळपास नाहिशी झाली आहे. सकाळी ९.३० ते १० पासूनच उन्हाचा चटका जाणवण्यास सुरवात होऊ लागली आहे.

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच उन्हाचा चटका आणि कमाल तापमानात वाढ होऊ लागल्याने आगामी उन्हाळ्याबाबत चिंता व्यक्त होऊ लागली आहे. सोलापूर जिल्ह्यात फेब्रुवारी व मार्च महिन्यात अवकाळी पाऊस, गारपीट झाल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडलेल्या आहेत.

सध्या उन्हाचा चटका व तापमानाचा पारा वाढू लागल्याने महिना अखेरपर्यंत किंवा मार्चच्या सुरवातीस अवकाळी पाऊस होऊ शकतो, अशी शक्यता आहे. यावर्षी जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावलेली आहे. त्यामुळे सध्या जिल्ह्यात मुबलक पाणी आहे. तरी देखील जिल्हा प्रशासनाच्यावतीने यंदाच्या उन्हाळ्यासाठी चारा व पाणी टंचाईचे नियोजन सुरू केले आहे.

# शिवालय शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्ष पदी हरिश सिध्दे यांची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवजयंती साजरी करणाऱ्या पहिल मंडळ म्हणून ज्या मंडळाच उल्लेख होतो त्या शिवालय सामाजिक संस्थेचे संस्थापक प्रकाश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्ष पदी हरिश सिध्दे यांची निवड करण्यात आली. माजी विरोधी पक्षनेते अमोल बापू शिंदे, उद्योजक प्रमोद मोरे, सुखदेव शिंदे, कार्यकारी अभियंता नवनाथ चव्हाण, शशी थोरात, राम गायकवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्ष हरिश सिध्दे, कार्याध्यक्ष शुभम नीळ, रोहन म्हमाणे, उपाध्यक्ष अभिजित शिंदे, राहुल भोसले , सेक्रेटरी रमाकांत ताटे, सह सेक्रेटरी स्वराज्य चव्हाण, खजिनदार प्रशांत बिराजदार, रितेश कदम,लेझीम प्रमुख शिवराज कलशेट्टी, महिबूब नदाफ, गजानन कोकाटे ॠतुज सिध्दे, मिरवणूक प्रमुख रोहन काटे, विनायक कटके, पुजा प्रमुख स्वप्निल कुलकर्णी, प्रसिद्धी प्रमुख आकाश फुलसे यांची निवड करण्यात आली. शिवजयंती दिनी चारशे मावळ्यांची लयबद्ध लेझीम ने मिरवणूकीने सांगता होईल.

## जाहीर समन्स

संकीर्ण/एस आर/१२२/२०२४.
संगणक २७९/२०२४.
आर. टी. एस.अपील/२०२४

**मे. उपविभागीय अधिकारी सो. माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कोर्टात**

श्री. भिवा श्रीपदी मुलादे } अपेलंट
॥ विरुद्ध ॥
शंकर कृष्णा मुलादे मयत वारस
नागन्नाथ शंकर मुलादे } रिस्पॉडट

या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अपेलंट यांनी मौजे वडशिंगे, ता.माढा येथील क. ग.नं. ३०९ चे वाटप प्रकरण क्र/२/एस.आर./१०९/२००८ कामी मे. तहसीलदार सो. माढा यांनी तारीख ६/६/२००८ रोजी दिलेले निर्णयाविरुद्ध व त्याबाबतचे मंडळ अधिकारी यांनी मंजूर केलेले फेरफार नंबर ५४६९ विरुद्ध नाराज होवून अपेलंट यांनी प्रस्तुत अपील केले आहे. अपील १६ वर्षे ३ महिने १८ दिवस विलंबाने दाखल केलेले असून अपीलासोबत विलंब माफीचा अर्ज सादर केला आहे. सदर अपीलाकामी आपण रिस्पॉडंट नं.५(अ) मल्लिलनाथ निवृत्ती मुलादे,रा.मादन हिप्परगा,ता. आळंद, ५ (ब) लक्ष्मी निवृत्ती मुलादे, रा. सदर ७) नामदेव कृष्णा मुलादे, मयत वारस पुतण्या नागन्नाथ शंकर मुलादे,रा.कारागृह, राजवाडा चौक,ता.मिरज,जि.सांगली ८अ) अमोल बळीराम मुलादे रा. लेगटी, पो.कमलापूर मोगळीलाड, जि. गुलबर्गा ८ब) उमा रवि उपार (गवंडी),रा.सदर९अ) ऋतुराज शामराव मुलादे,रा.कळके स्वती, वडजे यांचे घरी, बुधवार पेठ,सोलापूर १०) लक्ष्मी जनार्धन मुलादे, रा. सोलापूर, झोपडपट्टी नं.२,विजापूर जुना नकामागे,सोलापूर १३) ललिता संभा मुलादे, रा. रणदिवेवाडी, ता.माढा १४) उद्धव सभा मुलादे रा. रणदिवेवाडी, ता. माढा आहात. आपणास अपीलाच्या नोटीसा पाठवूनही बजावल्या गेल्या नाहीत व नोटीसा परत आलेल्या आहेत व आपण गैरहजर राहिलात. तरी वर नमुद रिस्पॉउंट यांना या जाहीर नोटीसीनी कळविणेत येते की, प्रस्तुत अपीलकामी तारीख १८/२/२०५ रोजी चौकशीसाठी माढा तहसील कार्यालयामध्ये नेमली असलेने सदर तारखेस सकाळी ११ वाजता स्वतः किंवा वकीलामार्फत वरील ठिकाणी माझे समोर हजर राहून आपले म्हणणे सादर करावे अन्यथा पुढील योग्य ते आदेश करणेत येतील.कळावे तारीख १०/२/२०२५

(लिपिक) (कोर्टाचा शिक्का)

**मे. उपविभागीय अधिकारी कार्यालय**
**माढा विभाग कुर्डुवाडी कॅंप माढा**
**तहसील कार्यालय माढा**

# पर्यटनामध्ये सेवा आणि मूल्य सुसंगत असले पाहिजेः अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यटनामध्ये सेवा आणि मूल्य सुसंगत असले पाहिजे.यामुळे पर्यटकांना आनंद मिळून पर्यटन केंदाला उत्पन्न मिळण्यास मदत होते असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी केले.

पर्यटन संचलनालय, पुणे, असेन्सिव्ह एज्युकेअर लि. (राष्ट्रीय कौशल्य विकास यंत्रणा) यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र येथे मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवासी जिल्हाधिकारी मनिषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांच्या प्रशिणार्थी उपस्थित होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर म्हणाल्या, कृषी पर्यटन ही एक उद्योन्मुख आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी संकल्पना आहे. कृषी पर्यटनामुळे नवीन अर्थजनाच्या संधी निर्माण होत आहेत. ग्रामीण व शहरी संस्कृतीचा संगम कृषी पर्यटनाच्या माध्यमातून होत आहे. गावाला व शेतीला नवी ओळख करून देणारी संकल्पना म्हणून कृषी पर्यटन राज्यासह देशात विस्तारत आहे. तसेच चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र चालवत असताना यापूर्वी प्रशिक्षण न घेता ही चिंचणी येथील कृषी पर्यटन केंद्र अतिशय उत्तम चालवून एक आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी निवासी जिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन महिला व पुरुषांना प्रशिक्षित करणे आवश्यक असल्यामुळे हा कार्यक्रम व्हिसा यांनी आयोजित केला आहे. या प्रशिक्षणामध्ये 40 प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला असून हे प्रशिक्षण शनिवार दि.15 फेब्रुवारी 2025 पर्यंत सुरु राहणार आहे. सदर प्रशिक्षण पर्यटन आणि आदरातिथ्य कौशल्य या आदीबाबतचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.यामधून पर्यटकांसोबत संवाद, आदरातिथ्य, स्वागत,काळजी घेणे आदीबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

प्रशिक्षण देण्यासाठी जनरल मॅनेजर सूर्या मुखर्जी व सत्यजित हे वरीष्ठ प्रशिक्षक पाच दिवस प्रशिक्षण देणार असून पाचव्या दिवशी परीक्षा घेवून प्रशिक्षणात सहभाग घेतलेल्या महिला व पुरुषांना प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे.

## पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र. (०२१८६) २२३२५३,२२३०१३ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६
ई मेलः– comcpandharpur@gmail.com

जा.क्र./पंनपं/न.अ./८५९/२०२५ दिनांक :– १०/०२/२०२५

### बांधकाम विभाग जाहीर टेंडर नोटीस क्र–सन २०२४–२५

पंढरपूर शहरातील विविध बांधकाम विषयक कामे करणाऱ्या सर्व अनुभवी मक्तेदारांना/पुरवठादार यांना कळविण्यात येते की, खालील कामांसाठी २ पाकीट पद्धतीने टक्केवारी पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. कोरे निविदा फॉर्म दिनांक–१३/०२/२०२५ पासून दिनांक –२४/०२/२०२५ पर्यंत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागात विना परतीच्या किंमतीस मिळतील. सीलबंद निविदा दिनांक–२७/०२/२०२४ अखेर नगरपरिषद पंढरपूर यांचे मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्विकारल्या जातील. सदरची निविदा दिनांक – २८/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा उपस्थितांसमोर निविदा मुख्याधिकारी यांचे दालनात उघडली जाईल. बयाना रक्कम निवेदे सोबत डिमांड ड्राफ्ट द्वारे जमा करावी. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा तसेच निविदा रद्द करणेचा आधिकार कसलेही कारण न देता राखून ठेवले आहेत. निविदेच्या इतर अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत मिळतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित र.रु. | बयाना र.रु. | कामाची मुदत | निविदा फॉर्म फीर.रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पंढरपूर शहरातील गुजराथी कॉलनीमधील समाजमंदीर येथे वाचनालयासाठी फर्निचर तयार करणे. | ९,९०,९८६/– | १००००/– | ३० दिवस | १०००/– |

**सही/–**
**(डॉ. प्रशांत जाधव)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

# बेवारस मयताबाबत संपर्क साधण्याचे आवाहन

**पंढरपूर(कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नंबर तीन वर एक अनोळखी पुरुश मयत झाला आहे. सदर मयत व्यक्तीबाबत माहिती असल्यास सबंधितांनी रेल्वे पोलीसांशी संपर्क साधवा असे, आवाहन पंढरपूर रेल्वे पोलीसांनी केले आहे.

अनोळखी व्यक्तीचे वय अंदाजे 35 वर्षे असून , उंची 170 से.मी, अंगाने सडपातळ, रंग काळा–सावळा, केस काळे, चेहरा उभट, नाक सरळ, अंगावर काळ्या रंगाची पांढ्या पट्टयाची ट्रॅक पॅन्ट व काळ्या रंगाचा टी शर्ट असे मयत व्यक्तीचे वर्णन आहे. संबधीतांनी तसेच ओळखीच्या व्यक्तीने याबाबत पंढरपूर लोहमार्ग पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# साहित्य संमेलनाच्या धर्तीवर राजधानीतून कवितासंग्रह प्रकाशित होणे स्तुत्य उपक्रम : उदय सामंत



**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):-** राजधानी दिल्लीत राहून दिल्लीतील मराठी माणूस मनापासून मराठीपण जपत आहे ही अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उद्या सामंत यांनी आज 'उजेडाचे प्रवासी' या कवितेच्या पुस्तक प्रकाशन सोहळयात केले. होऊ घातलेल्या साहित्य संमेलनाच्या धर्तीवर राजधानीतून कवितासंग्रह प्रकाशित होणे स्तुत्य उपक्रम असल्याचेही भावना श्री सामंत यांनी यावेळी व्यक्त केल्या.

सरहद संस्थेच्यावतीने आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्लीत होत आहे त्यानिमित्त दिल्लीतील मराठी व्यक्तींने लिहिलेल्या कवितांचा संग्रह 'उजेडाची प्रवासी' चा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र सदनात आयोजित करण्यात आला. त्याविषयी सामंत बोलत होते.

या प्रकाशन सोहळयास केंद्रीय सहकार तथा नागरी विमानन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, इंदिरा गांधी कला केंद्राचे सदस्य सचिव सच्चिदानंद जोशी, डॉक्टर सदानंद मोरे, डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे, महेंद्र कुमार लड्डा, सरहद संस्थापक संजय नहार आणि कवितासंग्रहाचे संपादन त्यांनी केले ते जीवन तळेगावकर यावेळी मंचावर उपस्थित होते.

98 साहित्य संमेलन दिल्लीत होत असून अधिकाधिक मराठी लोकांनी या साहित्य संमेलनाचा भाग व्हावा, असे आवाहन सामंत यांनी यावेळी केले.

दिल्लीतील मराठी लोक या साहित्य संमेलनाचे राजदूत असून साहित्य संमेलनामुळे उत्साहाचे वातावरण सर्वदूर पसरत असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे साहित्य संमेलन विशेष असल्याचाही उल्लेख श्री सामंत यांनी यावेळी केला.

केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी यावेळी दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनाचा भाग होता येत असल्याचा आनंद व्यक्त करून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेला अधिक चांगले दिवस येणार असल्याचे म्हणाले.

कार्यक्रमाची प्रस्तावना संजय नहार यांनी केली डॉ. सच्चिदानंद जोशी, डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे, डॉक्टर सदानंद मोरे, जीवन तळेगावकर यांनी समर्पक मनोगत व्यक्त केले.

आजच्या कार्यक्रमात दिल्ली विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठी व्यक्तींचा सन्मान सन्मान यावेळी करण्यात आला.

## महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर विभाग पंढरपूर**
**पत्ता – पदमावती तळ्याचे पाठीमागे, स्टेशनरोड, पंढरपूर**

दुरध्वनी क्र. ०२१८६–२२३५६३ ई मेलः– sdopndharpur2025@gmail.com

क्रं. भूसंपादन/कावि/२५७/२०२५ दिनांक ११/०२/२०२५

### अधिसूचना

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९

ज्या अर्थी सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ चे कलम ३ उपकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील जमिनीचा वापर हक्क करण्याची घोषणा करित आहे.

कोणी व्यक्ती ज्याचे संपादित जमिनीशी हितसंबंध आहेत ते या अधिसूचनेचे प्रसिध्दीचे दिनांकापासून २१ दिवासाचे आत अधिनियमांचे कलम ३ चे उपकलम (४) अन्वये आधीन राहून वरील प्रयोजनासाठी आवश्यक जमिनीचे उपयोगाचे बाबतीत आक्षेप घेऊ शकतात.

असा प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर जि. सोलापूर यांचेकडे लेखी स्वरुपात करावा, त्याचे निराकरण केले जाईल आणि सक्षम प्राधिकारी यांचकडून आक्षेप घेण्यास व्यक्तीशः किंवा विधी व्यवसायीद्वारे आपले म्हणणे मांडण्यासाठी अवधी दिला जाईल आणि अशा सर्व आक्षेपाबाबत त्यांची बाजू ऐकल्यानंतर त्याची अधिक सखोल चौकशी केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३ उपकलम (५) अन्वये सक्षम प्राधिकारी आवश्यकतेप्रमाणे असे आक्षेप स्वीकारु अथवा नाकारु शकतात.

सक्षम प्राधिकारी यांनी अधिनियम कलम ३ चे उपकलम (६) अन्वये देण्यात आलेला कोणताही आदेश अंतिम राहिल. या अधिसूचनेअंतर्गत येणाऱ्या जमिनीचे मोजणी नकाशे व इतर माहिती सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात हितसंबंधित व्यक्तींना पाहण्यास मिळू शकतील.

### अनुसूची

महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील मार्गाक्रमण करण्यात येणाऱ्या बांधीव अथवा मोकळया जागेचे संक्षिप्त वर्णन.

| अ.क्र | जमीनमालक किंवा भोगवटदार यांचे नाव | तालुका | गावाचे नाव | भूमापन क्रमांक | भूमिगत नळमार्ग टाकण्याकरिता किंवा भूमिगत वाहिन्या उभारण्याकरिता वापरहक्काचे संपादन करण्यासाठीची आवश्यक जमीन (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय भारत सरकार, गोविंद माणिक केदार, समाधान तुळशीदास केदार, कादिर सय्यद साहेब शेख, इसाहुसेनी जब्बार शेख | मोहोळ | वडाचीवाडी | ९१ | ०.२१५० |
| | | | | एकूण एकंदर | ०.२१५० |

**सही/– (विजया पांगरकर)**
**सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पंढरपूर विभाग पंढरपूर**

जिमाका/सी/जाहि/३०५/२०२४–२५

Classified - छोटी जाहीरात

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# पद्मशाली युवक संघटनेच्यावतीने श्रीनिवास भाऊ संगा यांचे सन्मान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने राजमल बोमड्याल मंगल कार्यालयात अखिल भारत पद्मशाली युवजन संघमच्या अध्यक्ष पदी श्रीनिवास भाऊ संगा यांची निवड झालेबद्दल सत्कार संभारम अत्यंत उत्साही वातावरणांत पार पडले.

सदर कार्यक्रम महाराष्ट्र राज्य पद्मशाली संघमचे प्रधानसचिव यशवंत इंदापुरे यांचे अध्यक्षतेखाली , पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, सेवानिवृत्त संघाचे उपाध्यक्ष अनिल कन्ना, पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम प्रेसिडेंड नागेश बोमड्याल,सचिव विजय निली आदीच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

प्रथम प्रेसिडेंट नागेश बोमड्याल यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनतर आदरणीय श्रीनिवास भाऊ संगा यांचे पुष्पहार, मोमेंटम आणि बुके देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यांत आले.सेवानिवृत्त संघाचे उपाध्यक्ष अनिल कन्ना यांनी मार्गदर्शन पर भाषणांत श्रीनिवास भाऊ संगा यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या तर सत्कारादाखल श्रीनिवास भाऊ संगा यांनी युवक संघटनेचे आभार मानले.तसेच अखिल भारत पद्मशाली संघमचे अधिवेशन 9 मार्च 2025 रोजी हैद्राबाद येथे अधिवेशन असून युवकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले. माधवी अंदे यांनी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणांत यशवंत इंदापुरे यांनी हैद्राबाद येथील अधिवेशनास उपस्थित राहून युवकांनी एकीचे बळ दाखववे असे आवाहन केले. श्रीनिवास भाऊ यांना पुढील कारकिर्दिस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास युवक संघटनेचे माजी अध्यक्ष साईराम बिर्रू, गिरीश कोटा, राकेश पुंजाल, रविंद्र गड्डम, तुषार जक्का, सुधाकर नराल, रोहन श्रीराम, श्रीनिवास यन्नम, अमर बोडा, कपिल आकेन आदी आजी माजी पदाधिकारी तसेच युवक युवती उपस्थित होते.

युवक संघटनेचे उपाध्यक्ष अंबादास कुडक्याल, गोविंद राजूल, अॅड श्याम आडम सहसचिव अविनाश शंकू आदींनी कार्यक्रम यशस्वी होणेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आणि आभार व्यंकटेश आकेन मानले.

# श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ जल्लोषात साजरा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ येथील श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ जल्लोषात साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती फोटो पूजनाने झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संस्थापक सचिव सुनील झाडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण पासले हे मार्गदर्शक म्हणून या कार्यक्रमास लाभले. तसेच दहावीला वगार्ला शिकवणाऱ्या शिक्षकांनी वर्षभर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अथक परिश्रम घेतले. तसेच संस्थेचे संस्थापक सचिव सुनील झाडे यांनी इयत्ता दहावीला शिकवणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. धरती पाटील व महानंदा गाडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. संस्था संचालक मोहित झाडे, प्रथमेश झाडे, व्यवस्थापक मिलन ढेपे, व्यवस्थापिका धरती पाटील, मुख्याध्यापिका वीणा कदम, सलमान मुल्ला, विद्या पवार, समन्वयक पौर्णिमा सुरवसे, रूपाली कोकाटे, प्राजक्ता आरबळकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी मधील अंशूला कळसे, राजनंदिनी फाटे, रेवा देशमुख, प्रियंका माळी, प्रद्युम्न केवळे यांनी केले तर आभार कृष्णा बागल हिने मानले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी केले असून त्याचे प्रतिनिधित्व आदित्य माळी याने केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# पोखरापूरच्या जगदंबा मंदिर व शाळेला शक्तिपीठ महामार्गाचा धोका: फेर सर्व्हेक्षण करण्याची मागणी

**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):-** नागपूर –गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या संपादित क्षेत्रात पोखरापूर येथील श्री जगदंबा माता मंदिर व माध्यमिक–उच्च माध्यमिक शाळेच्या वर्ग खोल्या व क्रीडांगण विकसित केलेल्या जमीनीच्या समावेश असल्याने पोखरापूर येथील श्री जगदंबा माता मंदिर व शाळेला शक्तिपीठ महामागार्चा दुहेरी धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे या ठिकाणी महामागार्साठी पुनर्सरेखन करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे देवस्थानाचे अध्यक्ष नंदकुमार कदम यांनी केली आहे.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून उभारणी करण्यात येत असलेला नियोजित नागपूर – गोवा शक्तिपीठ महामार्ग मोहोळ तालुक्यातील पोखरापूर गावालगत व नव्याने बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेलगत गेल्याने तसेच श्री जगदंबा माता मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा इमारतीतला धोका निर्माण झाला आहे. यापूर्वीच राष्ट्रीय महामार्ग( पालखी मार्ग) क्र. ९६५ च्या संपादित क्षेत्रात श्री जगदंबा माता मंदिर गेल्याने देवस्थान ट्रस्टचे वतीने कोर्टात धाव घेतली होती, मा. उच्च न्यायालयात मुंबई यांचे आदेशानुसार पुरातत्व खात्याचे नियंत्रणखाली गट नं. १२५/२/ब मधील उर्वरित जागेत श्री जगदंबा माता मंदिराचे पुनर्रोपन बांधकाम सुरू केले आहे. दरम्यान महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून नागपूर–गोवा शक्तीपीठ महामार्ग आखण्यात आला आहे.त्याचे



सर्वेक्षण मे. मोनार्क सर्व्हेअर अँड इंजिनीअरिंग कन्सल्टन्सी प्रा. लि. पुणे यांनी केले आहे. भारत सरकारच्या राजपत्रात नमुद केलेल्या मार्गदर्शक सूचना नियम व अटींचे पालन सर्व्हेक्षण करताना कंपनीने केलेले नाही. राजपत्रातानुसार देवस्थान मंदिरे, शाळा, प्रार्थना स्थळे, क्रिडांगण, प्राथमिक आरोग्य केंद्रे, जलस्रोत–विहीरी, तलाव, बागायती जमिनी इत्यादी बाबीं वगळण्यात याव्यात असे स्पष्टपणे नमुद केले आहे. परंतु याचा अजिबात विचार न करता आखणी केली आहे. ही बाब हिंदू देव–देवतांची मंदीरे संपुष्टात आणण्याचा डाव असल्याची आरोप होत आहे.याबाबत हरकत नोंदविण्यात आली आहे. येथील जगदंबा विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेजची संपूर्ण इमारत बांधकाम व क्रिडांगण संपादित क्षेत्रात आले आहे. त्यामुळे श्री जगदंबा माता मंदिर पुन्हा एकदा धोक्यात आले आहे. पोखरापूर व परिसरातील नागरिकांनी शक्तीपीठ महामागार्ला तीव्र विरोध केला आहे. ग्रामपंचायत पोखरापूर यांच्या वतीने आक्षेप नोंदवला असून श्री.जगदंबा माता मंदिर व माध्यमिक–उच्च माध्यमिक शाळा सुरक्षित ठेवूनच गटनंबरच्या किमान ५००मीटर अंतराच्या बाहेरून शक्तीपीठ महामागार्साठी पुनर्सरेखन करण्याची मागणी देवस्थान ट्रस्टचेवतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे व जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे केली आहे.

हिंदूत्वादी सरकारने भारतीय राष्ट्रीय महामार्गात व शक्तिपीठ महामार्गात संपादित क्षेत्रात येणारी हिंदू देव–देवतांची मंदीरे सुरक्षित ठेवावी. शक्तिपीठ महामार्ग करताना पोखरापूरचे आराध्य दैवत श्री जगदंबा मातेचे मंदिर सुरक्षित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना तातडीने पुनर्सरेखन करण्याचे आदेश द्यावेत – श्रीधर उन्हाळे,मुख्य विश्वस्त

# ए. डी. जोशी कॉलेजचे जेईई मेन परीक्षेत यश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जेईई मेन – १ परीक्षेत ए. डी. जोशी कनिष्ठ महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले असून योगेश क्षीरसागर याने ९९.५२ पर्से टाइल मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

यंदा ए. डी. जोशी कनिष्ठ महाविद्यालयातील चाँदसाब उजलुम्वले (९८.२६), बागलकोट हर्षवर्धन(९६.०८), नयन कुलकर्णी (९६.००), सार्थकराजे चव्हाण(९५.२५), नुपूर देशपांडे (९४.५६), केदार स्वामी (९३. ६४), हषार्ली इंगळे (९२.२८), महेश चव्हाण (९१.१०), आदित्य यादव (९०.८८), पुष्कराज पाटील (८९.९२), रितेश मेंगजी (८९. २०), संस्कृती व्हटकर श्रेया फुलारी(८९.२०),(८८.५४), सार्थक बाविकर (८८.०९), प्रथमेश गोलेकर (८५.००) या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, प्राचार्य प्रवीण देशपांडे व सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

# शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली पोलीस प्रशासनासोबत बैठक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने 19 तारखेला निघणाऱ्या विविध मंडळाच्या मिरवणूक संदर्भात शहर पोलीस आयुक्तालय येथे बैठक पार पडली, यावेळी नानासाहेब काळे, दिलीप कोल्हे, सुशील बंदपट्टे, नरेंद्र काळे, संजय शिंदे, सुनील रसाळे, महेश हनमे, सचिन स्वामी, वैभव गंगने यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते, मिरवणूक परवानगीसाठी येणाऱ्या अडचणी संदर्भात चर्चा करण्यात आली, येणाऱ्या दोन ते तीन दिवसात मंडळांना 19 तारखेला मिरवणुकीसाठी परवानगी मिळेल, असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले,

त्यामुळे सर्व मंडळांनी मिरवणूक परवानगी संदर्भात कोणतीही काळजी करून नये सर्व मंडळांना मिरवणुकीसाठी परवानगी मिळणार असून सर्व मंडळांनी उत्साही वातावरणात नियमांचे पालन करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करावी असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोनिया कागदे यांची महसूल सहाय्यक पदावर निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** दसुर (ता.माळशिरस) येथील सोनिया शरद कागदे यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून महसूल अधिकारी (महसूल सहाय्यक) पदावर निवड मिळवली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश निश्चितच इतरांना प्रेरणादायी ठरणार आहे.

सोनिया यांनी स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर येथून संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीची पदवी घेतली. उच्च शिक्षण घेत असतानाच त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली. अभ्यासातील सातत्य,कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले.त्यांच्या या यशाबद्दल कागदे परिवार, दसुर गावचे ग्रामस्थ व स्वेरी परिवार यांनी आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले आहे.त्यांच्या या यशामुळे गावातील अनेक तरुणांना प्रेरणा मिळणार आहे. स्वप्न मोठी असली की संघर्षही मोठा करावा लागतो.जिद्द चिकाटी आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते, असे सोनिया यांनी सांगितले. त्यांनी आपले यश आई–वडील, शिक्षक, मार्गदर्शक आणि स्वतःच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना समर्पित केले आहे.

# रद्दी खरेदीसाठी दरपत्रक देण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा माहिती कार्यालयातील (सोलापूर) वर्तमानपत्रांची रद्दी विकण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत असून, इच्छुकांनी ( शॉप अॅक्ट लाईसन्स आवश्यक) या कार्यालयाची रद्दी खरेदी करण्यासाठी दरपत्रक सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सोलापूरच्या वतीने करण्यात येत आहे. जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी (मराठी व इंग्रजी), जुने मासिके पाहण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, दरपत्रके तीन प्रतीत बंद पाकीटात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर. या नावाने नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला क विभाग, सोलापूर –1. या पत्यावर पाठवावीत. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख 21 फेब्रवारी 2025 अशी आहे.

# ‘मृत्यूजंय दूत पुरस्कार’– अपघात समयी मदत करणाऱ्यांचा सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मागील काही वर्षामध्ये शासनाकडून दळववळण सुलभ होण्यासाठी चांगल्या प्रकारचे रस्ते बांधणी सुरू आहे. यामुळे वाहनांना चांगल्या प्रकारचे रस्ते व सुविधा मिळत असल्याने प्रवासांचा वेळ कमी झाला आहे. तसेच रस्त्यावर अपघात देखील होत आहेत.रस्ते अपघातामध्ये अपघात मिळाल्यानंतर जखमींना वेळीच मदत मिळाल्यास तसेच वैद्यकीय उपचार मिळाल्यास त्यांचा प्राण वाचू शकतात. अपघातामध्ये वेळीच व तात्काळ मदत करणारे इसमांचे कौतूक करण्यासाठी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी ‘मृत्यूजंय दूत’ हा पुरस्कार सुरू केला आहे. त्यामध्ये महिनाभरामध्ये जिल्ह्यातील अपघातामध्ये मदत करणारे नागरिकांचा प्रशांसापत्र देवून गौरव करण्यात येत आहे.

दिनांक 09/02/2025 रोजी मोहोळ पोलीस ठाणेच्या हद्दीतून जाणारे सोलापूरहून पुण्याकडे जाणारे खाजगी प्रवासी बसचा अपघात झाला होता. अपघातामध्ये बस पलटी होवून बसममध्ये असलेल्या प्रवाशांपैकी 15 प्रवासी जखमी झाले होते. अपघातानंतर तेथे हजर असणारे वैभव दत्तात्रय भोई, रा. वडापूर ता. दक्षीण सोलापूर यांनी आपल्या पायात चप्पल नसताना देखील आपल्या जिवाची परवा न करता पायाने



लाथा मारून बसच्या काचा फोडून बसमध्ये अडकलेल्या जखमी व इतर नागरिकांना रस्त्यावरून येणारे जाणारे वाहनांना विनंती करून उपचारासाठी रवाना केले होते. त्याच्या प्रषंसनिय व अतुलनिय कामासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून दखल होवून ‘मृत्यूजंय दूत’ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

तसेच दिनांक 03/02/2025 रोजी विनोद भास्कर भोसले, रा. लवंग, ता. माळशिरस हे आपल्या मोटार सायकलवरून टेंभूर्णीहून अकलूजकडे जात असताना जांभूळबेट पाटीजवळ एक इसमास अज्ञात वाहनाने धडक देवून गंभीर जखमी केले होते. तो इसम जखमी अवस्थेत विव्हळत पडला होता. तेथे बऱ्याच बघ्यांची गर्दी जमली होती. परंतू विनोद भोसले यांनी तेथील परिस्थीती पाहून अॅब्युलन्सचा टोल फ्री क्रमांक 108 वर फोन करून अॅब्युलन्स घटनास्थळावर बोलावून जखमीस उचारासाठी रवाना केले. तसेच त्याबाबतची माहिती पोलीसांना देखील दिली. त्यांच्या या कार्यास देखील ‘मृत्यूजंय दूत’ पुरस्कार देण्यात आला आहे.

सदर दोन्ही पुरस्कार विजेत्यांना आज दिनांक 13/02/2025 रोजी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी मासिक गुन्हे सभेमध्ये बोलावून त्यांना प्रषंसापत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मानीत केले आहे. तसेच अपघातामध्ये मदत करणारे लोकांना पोलीस तपासाची कोणताही त्रास होणार नाही याची हमी पोलीस अधीक्षकांनी दिली आहे.

सदरवेळी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर गामीण, जिल्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार हजर होते.

# अ.भा. उर्दू साहित्य संमेलन समितीचे पुरस्कार जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अ.भा.उर्दू साहित्य संमेलन समितीच्यावतीने यंदाचा वर्षी आनंद देशपांडे यांचा 'उर्दू मित्र' म्हणून तर शिक्षण क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मुख्याध्यापक आसिफ इक्बाल तर साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे कवी इरफान कारीगर यांना गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती माजी महापौर अॅड. यू. एन. बेरीया यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरवर्षी उर्दू दिनानिमित्त मराठी भाषिकातून उर्दू भाषा अवगत असणाऱ्या व उर्दू भाषेवर प्रेम करणाऱ्या एका मान्यवरांचा 'उर्दू मित्र' म्हणून, तर उर्दू साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात तसेच उर्दू



भाषेच्या विकासासाठी उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना त्यांच्या योगदानासाठी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. हा पुरस्कार वितरण समारंभ शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता कॉ. एन. आर. बेरिया शैक्षणिक संकुल, लष्कर येथे आयोजित करण्यात आला आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते जेष्ठ कवी बशीर परवाझ व प्रा.आय.आय. मुजावर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ आणि प्रत्येकी पाच हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पत्रकार परिषदेस इकबाल सय्यद, मोहम्मद शफी, नासिर आळंदकर आदी उपस्थित होते.

# चौदा दिवसांच्या वनवासाहून परतल्यानंतर 4 रामभक्तांचे विठ्ठलवाडीत उत्साहात स्वागत

**माढा (कटूसत्य वृत्त):-** आजही आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञानाच्या युगात समाजप्रबोधनाबरोबरच लोकांचे मनोरंजन व्हावे यासाठी ग्रामीण भागात रामायणाचे वर्षभर वाचन करतात आणि त्याचा सांगितलेला अर्थ आवडीने ऐकायला दररोज भाविक भक्त येतात.काही रामभक्त तर संपूर्ण रामायण ग्रंथाचे वाचन पूर्ण होईपर्यंत डोक्याचे केस न कापणे व दाढी करीत नाहीत,मांसाहारही वर्ज्य करतात, दररोज धार्मिक पुजापाठ व विधी करतात. असाच प्रत्यय विठ्ठलवाडी ता.माढा येथे आला असून ऑगस्ट 2024 पासून गावात रामायण ग्रंथाचे वाचन व अर्थ सांगणे सुरू आहे. गावातील चार रामभक्तांनी रामायण पाळलेले असून ते 14 दिवसांच्या वनवासाहून



परतल्यानंतर त्यांचे गावात ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र भांगे व त्यांच्या पत्नी सुजाता भांगे यांनी औक्षण करून मोठ्या उत्साहात स्वागत केले.

विठ्ठलवाडी गावातील हभप विठ्ठल कदम,पांडुरंग शिंगाडे, भारत कदम व साधू सस्ते यांनी रामायण पाळलेले आहे.हे रामभक्त 28 जानेवारी 2025 रोजी डोक्यावर टोपी व अंगात पोत्याचा पारंपरिक वेश परिधान करून, हातात विणा, खांद्यावर भगवी पताका व राम,लक्ष्मण,सीता व हनुमानाचा फोटो हातात घेऊन अनवाणी विठ्ठलवाडी येथून वाराणसी, अयोध्या, प्रयागराज, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पंढरपूर या धार्मिक स्थळांना भेटी देत विठ्ठलवाडी या मूळ गावी सुखरूप पोहोचले. या रामभक्तांनी प्रयागराज येथे महाकुंभमेळयात दोन वेळा पवित्र स्नान केले. सर्व वैयक्तिक कामे व प्रापंचिक गोष्टींचा त्याग करून अशा पद्धतीने 14 दिवस वनवास भोगणे ही गोष्ट मनात प्रचंड इच्छाशक्ती व धार्मिक वृत्ती आणि रामभक्ती शिवाय शक्य नाही. या कृतीतून आम्हाला मानसिक समाधान व आत्मिक आनंद लाभल्याच्या भावना या रामभक्तांनी व्यक्त केल्या आहेत.

आजही समाजाला राम,लक्ष्मण, सीता व हनुमान या चार व्यक्तिरेखांचा आदर्श व त्यांचे थोर विचार जपण्याची गरज आहे. आजच्या समाजातील काही घटना व प्रसंग ऐकले व पाहिल्यानंतर खरोखरच मन सुन्न होते आणि वेदना होतात.तेंव्हा आजच्या पिढीलासमोर रामायणातील व्यक्तिरेखांचे आदर्श आचरण कथीत करणे गरजेचे आहे.याच व्यापक उद्देशाने गावातील रामभक्त व इतर भाविक भक्तांनी रामायण ग्रंथाचे वाचन व अर्थ सांगण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे.याला ज्येष्ठ नागरिक, भाविक भक्त व महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या रामभक्तांच्या स्वागताच्या वेळी तंटामुक्ती अध्यक्ष अरुण मोरे, हनुमंत पाटील, श्रीमंत कदम, अर्जुन शिंगाडे, धर्मा उमाटे, अंगद कदम, कांतीलाल मुळे, सुशेन भांगे, मोहन भांगे, विशाल कदम, महेश भांगे, सुजाता भांगे, शांता भांगे, नंदा कदम, सुरेश कदम, दत्तात्रय काशीद, सक्षम भांगे यांच्यासह ग्रामस्थ व भाविक भक्त उपस्थित होते.

# संरक्षण मंत्रालय पुणे जनसंपर्क अधिकारीपदी अंकुश चव्हाण सीबीसी सोलापूरचा अतिरिक्त प्रभार

**पुणे (कटूसत्यवृत्त):-** भारतीय माहिती सेवेतील अधिकारी अंकुश चव्हाण यांची संरक्षण मंत्रालयाच्या पुणे येथे जनसंपर्क अधिकारी म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे. त्यांनी उपसंचालक आणि जनसंपर्क अधिकारी निखिल देशमुख यांच्याकडून पदभार स्वीकारला.त्यांच्याकडे आर्मी, नेव्ही,एअर फोर्स आणि डिफेन्स इन्स्टिट्यूटच्या जनसंपकार्ची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

केंद्रीय संचार ब्यूरो सोलापूर, योजना मासिकाचे संपादक आणि प्रकाशन विभाग पुणे या कार्यालयांचा अतिरिक्त प्रभार अंकुश चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला



आहे. चव्हाण माहिती आणि प्रसारण मंत्रालयानासह विविध विभागांमध्ये गेली 15 वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यापूर्वी चव्हाण यांनी महाराष्ट्र शासनामध्ये पाणीपुरवठा स्वच्छता विभाग व सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागांमध्ये अधिकारी म्हणून कार्य केले आहे. त्यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे.